# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक १५/२०२१** **दिनांक १८/०२/२०२१** **कालावधी ५ दिवस**

| **डॉ. प्रशांत बोडके,**<br>विभाग प्रमुख,<br>कृषिविदया विभाग<br>९४२०४१३२५५ | **डॉ. विजय मोरे,**<br>नोडल ऑफिसर,<br>कृषिविदया विभाग<br>९४२२३७४००१ | **डॉ. शितल यादव,**<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषिविदया विभाग<br>८३७९९०११६० |
|---|---|---|

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १२/०२/२०२१ ते १८/०२/२०२१) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १९/०२/२०२१ सकाळी ८:३० पासून २३/०२/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | | १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ५ | ७ | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | २८ | २९ | २८ | २९ | ३० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | १६ | १७ | १६ | १६ | १६ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | निरभ्र | निरभ्र |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ५६ | ४५ | ५० | ४९ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३३ | ३३ | ३१ | २५ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | १० | ९ | ८ | ५ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०९०.६ |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयात दिनांक १८ ते २० फेब्रुवारी २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या ते हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली असून आकाश अंशत: ढगाळ राहील तसेच वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवते.** |
| **इशारा** | **दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी रायगड जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | - | • दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ रोजी जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने गाई, म्हैशी इ. जनावरे झाडाखाली न बांधता सुरक्षित ठिकाणी पाण्याच्या ठिकाणापासून दूर बांधावेत. |
| **विशेष सल्ला** | - | • दिनांक १८ ते २० फेब्रुवारी २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने पक्व पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| **आंबा** | मोहोर ते फळधारणा अवस्था | • ढगाळ आणि पावसाळी वातावरण संभवत असल्याने **आंबा फळांवर करपा रोगाचा** प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून रोगाच्या प्रादुर्भावामुळे फळांवर काळे डाग पडण्याची शक्यता असल्याने **दिनांक १७ ते २० फेब्रुवारी दरम्यान पाऊस झाल्यास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून करपा रोगाच्या** नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथाईल १० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी **दिनांक २० फेब्रुवारी नंतर** करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • दिनांक १८ ते २० फेब्रुवारी २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने आंबा फळांचे पाऊसापासून संरक्षण करण्यासाठी अंडाकृती आकाराच्या आंबा फळांना कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे. आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• आंबा फळांवर **फुलकीडींचा** (थ्रीप्स) प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या प्रादुर्भावामुळे फळांची साल खरवडल्यासारखी दिसते व फळांवर खाकी किंवा राखाडी रंगाचे चट्टे दिसून येतात. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास फुलकीडींच्या नियंत्रणासाठी ४५ टक्के स्पीनोसॅड २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून संपूर्ण झाडावर पाऊसाची उघडीप असताना फवारावे.<br>• आंबा **फळधारणा** होवून वाटाणा आकाराच्या अवस्थेत असताना फळांवर तुडतुड्याचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार **चौथी फवारणी** (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी.<br>• मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार **पाचवी फवारणी** (चौथ्या फवारणी नंतर १५ दिवसांच्या अंतराने) डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. सदर द्रावणात भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वापरावे.<br>• मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथ्या ते सहाव्या फवारणीत **फळगळ कमी करण्यासाठी २ टक्के युरिया (२० ग्रॅम युरिया/ लिटर पाण्यातून) फवारावे**. यासाठी प्रथम युरिया पाण्यात पूर्णपणे विरघळून घ्यावा व नंतर त्यात कीटकनाशक टाकावे.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | फळधारणा | • **ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर **फुलकिड आणि ढेकण्याचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **<u>टीप:</u>** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात. |
| **वाल** | शेंगा अवस्था | • ढगाळ वातावरण संभवत असल्याने वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडी कोवळ्या शेंड्यावर पानाच्या खालच्या भागातील रस शोषून घेतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते तसेच किडीने बाहेर टाकलेल्या मधासारख्या चिकट द्रावणामुळे पानांजवळ काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. आवश्यकता वाटल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांनंतर करावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला/ कलिंगड** | फुलोरा ते फळधारणा अवस्था | • ढगाळ पाऊसाळी वातावरण संभवत असल्याने वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये केवडा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून रोगाचा प्रादुर्भावामुळे पानांवर पिवळसर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | झायनेब २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी.<br>• ढगाळ पाऊसाळी वातावरण संभवत असल्याने कलिंगड आणि इतर वेलवर्गीय पिकामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने फळमाशीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यापासून शेतामध्ये प्रती एकरी दोन 'क्यु ल्युर' रक्षक सापळे लावावेत. |
| **वांगी**, **मिरची**, **टोमेटो** | वाढीची अवस्था | • ढगाळ वातावरण संभवत असल्याने वांगी, मिरची, टोमेटो पिकावर तुडतुडे व मावा रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी पिकामध्ये पिवळे चिकट कागदाचे सापळे लावावेत. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भेंडी** | वाढीची अवस्था | • ढगाळ वातावरण संभवत असल्याने उन्हाळी भेंडी पिकावर तुडतुडे व मावा रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी पिकामध्ये पिवळे चिकट कागदाचे सापळे लावावेत. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.